# शौर्य मराठी
महाराष्ट्राचे निडर दैनिक
RNI-MAHMAR/2023/89125
epaper.shauryamarathi.com
जळगाव, धुळे, नंदुरबार | शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६ | वर्ष २ रे | अंक १४९ किंमत : ५ रु. | पाने ४


## दिन विशेष...
१३१७ : संत गोरा कुंभार यांनी समाधी घेतली.
१७५५ : रामदास स्वामींची मानसकन्या, प्रवचनकार, थोर विदुषी वेणाबाई यांचे निधन.
१७५५ : होमिओपॅथीचे जनक समजले जाणारे डॉ. हॉनिमन यांचा जन्म.
१८७५ : महर्षि दयानंद सरस्वती यांनी आर्य समाजाची स्थापना केली.

| सेन्सेक्स | ७६,६३१.६५ | -९३१.२५ (१.२०%) |
|---|---|---|
| डॉलर | ₹ ९२.५८ | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३६ | २२ |
| दिल्ली | २९ | १८ |
| मुंबई | ३४ | २४ |
| नागपूर | ३६ | २२ |
| पुणे | ३६ | १८ |

## सुविचार
सुख आणि दुःख हे जीवनाच्या चढ-उतारांसारखे आहेत. त्यांना समान भावनेने स्वीकारा आणि जीवनाचा आनंद घ्या.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:१३ संध्या-६:४५

**सोने – चांदी**
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५४,०९०/- २,५५,०००/-

# कल्पक्कम फास्ट ब्रीडर रिऍक्टर अणुऊर्जा प्रकल्प
# भारताला अणुऊर्जा क्षेत्रात ऐतिहासिक यश

## रशियानंतर जगात केवळ भारताचाच डंका!

वृत्तसंस्था । कल्पक्कम

**जागतिक महासत्तांना जे जमले नाही, ते भारतीय वैज्ञानिकांनी साध्य केले आहे. तामिळनाडूच्या कल्पक्कम येथील ५०० मेगावॅट क्षमतेच्या प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर रिऍक्टरने स्वयंचलित अणुसाखळी प्रक्रियेचा टप्पा यशस्वीपणे ओलांडला असून हा टप्पा पार करणारा भारत आता जगातील दुसरा देश ठरला आहे.**



इराण विरुद्ध अमेरिका- इस्रायल युद्ध सुरू झाले आणि जगाच्या समोर ऊर्जेचा प्रश्न आ वासून उभा राहिला, भारतही त्याला अपवाद नव्हता. पर्यावरणपूरक ऊर्जेच्या गप्पा कितीही मारल्या तरी आजही जगातील बहुतांश ऊर्जा प्रश्न हा तेलाभोवती फिरतो आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आणि अनेक देशांच्या प्रगतीलाच खीळ बसतेय की, काय अशी परिस्थिती निर्माण झाली.

या पार्श्वभूमीवर भारताने अणुऊर्जेच्या क्षेत्रात एक महत्त्वाची भरारी घेतली आहे. कल्पक्कम येथे उभारण्यात आलेल्या फास्ट ब्रीडर रिऍक्टरने स्वयंचलित अणुसाखळी प्रक्रियेची पातळी यशस्वीरित्या गाठली आहे. त्यामुळे ही पातळी गाठणारा भारत हा जगातील दुसरा देश ठरला आहे. महत्त्वाचे म्हणजे हे यश अण्वस्त्रधारी देश असलेल्या रशिया आणि अमेरिकेलाही शक्य झालेले नाही. त्यामुळे भारताचे ऊर्जेच्या क्षेत्रातील अवलंबित्व कमी होणार आहे.

### अमेरिका- फ्रान्स आणि जपानचे अपयश
अणुऊर्जा क्षेत्रातील भारताचे हे यश तांत्रिक असले तरी ते तेवढेच महत्त्वाचे आहे. कारण ही पातळी गाठण्याआधीच आलेल्या अपयशामुळे अमेरिका- फ्रान्स आणि जपान या सारख्या देशांनाही फास्ट ब्रीडर रिॲक्टरचे प्रकल्प अर्धवट सोडून द्यावे लागले. भारताचे हे यश देशाच्या दीर्घकालीन राष्ट्रीय धोरणाचा परिपाक आहे. तामिळनाडूमधील कल्पक्कम येथे उभारण्यात आलेल्या ५०० मेगावॅट क्षमतेच्या प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर रिऍक्टरने ६ एप्रिल रोजी 'फर्स्ट क्रिटिकॅलिटी' साध्य केली.

### आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे कौतुक
ही क्रिटिकॅलिटी म्हणजेच असा टप्पा की, ज्यानंतर रिऍक्टरमध्ये स्वयंचलित पद्धतीने सातत्यपूर्ण अणुसाखळी प्रक्रिया सुरू होते. ही घटना साधी नव्हे तर अणुसंशोधन आणि अणुऊर्जेच्या क्षेत्रातील खूप मोठी घटना आहे. किंबहुना त्यामुळेच आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेनेही भारताच्या या कामगिरीचे कौतुक केले आहे. अनेक वर्षांच्या संशोधन, प्रयोग आणि अपयशांनंतर मिळालेला हा यशस्वी टप्पा भारतीय वैज्ञानिकांच्या चिकाटीचे प्रतीक आहे, असे ने म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या यशाचे वर्णन 'भारताच्या अणुऊर्जा प्रवासातील निर्णायक पाऊल असे केले आहे. फ्रान्सने ङ्कसुपरफेनिक्सफनावाचा १२०० मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प उभारला होता. तो जगातील पहिला मोठा व्यावसायिक ब्रीडर रिऍक्टर ठरेल, अशी अपेक्षा होती. मात्र, तिथेही सोडियम गळती, आग, गंज आणि राजकीय विरोध यामुळे हा प्रकल्प अपयशी ठरला. १९९८ मध्ये तो कायमचा बंद करण्यात आला. जपानमधील ङ्कमोनजूफअणुभट्टीलाही अशाच समस्यांना सामोरे जावे लागले. १९९५ साली सोडियम गळती आणि आग, तसेच पुढील अपघातांमुळे तो केवळ २५० दिवस चालला आणि अखेर २०१६ मध्ये बंद झाला. कल्पक्कममधील केवळ तांत्रिक नव्हे, तर धोरणात्मकदृष्ट्याही महत्त्वाचा आहे. भारताच्या अणुऊर्जा कार्यक्रमाचा पहिला टप्पा म्हणजे नैसर्गिक युरेनियम वापरून वीज निर्मिती हा आधीपासूनच सुरू आहे. या प्रक्रियेत प्लुटोनियम तयार होते. दुसऱ्या टप्प्यात, म्हणजेच सारख्या रिऍक्टरमध्ये, हे प्लुटोनियम वापरून अधिक इंधन तयार केले जाते. तिसऱ्या टप्प्यात, भारताच्या थोरियम साठ्याचा वापर करून युरेनियम-२३३ निर्माण केले जाईल, जे पुढील पिढीच्या अणुभट्ट्यांसाठी महत्त्वाचे इंधन ठरेल.

### परदेशी अवलंबित्व कमी होणार
याचा अर्थ असा की, भारत भविष्यात अणुऊर्जेसाठी परदेशी इंधनावर अवलंबून राहणार नाही. सध्या भारताची अणुऊर्जा उत्पादन क्षमता सुमारे ८ गीगावॅट आहे, जी २०४७ पर्यंत १०० गिगावॅटपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे. सारखे प्रकल्प या उद्दिष्टपूर्तीसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत.



## थोडक्यात



### बंगालमध्ये सत्तापरिवर्तन अटळ
**आसनसोल ।** देशाच्या एकूण उत्पादनात (जीडीपी) १२ टक्के वाटा उचलणाऱ्या बंगालचे योगदान आता केवळ ५ टक्क्यांवर आले आहे. ही आर्थिक घसरण राज्याच्या अधोगतीचे लक्षण आहे. आसनसोलमधील स्थानिक प्रश्नांना हात घालताना पंतप्रधानांनी सिंडिकेट राजवर प्रहार केला. इथल्या एकेकाळच्या वैभवशाली उद्योगांनी पलायन केले आहे.गुंतवणूकदार पाठ फिरवत आहेत. ही परिस्थिती बदलण्यासाठी भाजपचे डबल इंजिन सरकारच आवश्यक आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### लाडक्या बहिणींना लागणार लॉटरी
**सिंधुदुर्ग ।** : राज्यातील लाखो लाभार्थी महिलांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अंतर्गत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शासनाने पुन्हा एकदा मुदतवाढ दिली आहे.आता ही मुदत ३० एप्रिल २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे. ई-केवायसीची प्रक्रिया ३० सप्टेंबर २०२५ पासून सुरू झाली होती. सुरुवातीला नोव्हेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती.त्यानंतर ती ३१ डिसेंबर २०२५, नंतर ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढवण्यात आली होती. आता महिलांकडून आलेल्या तक्रारी, पोर्टलवरील तांत्रिक अडचणी आणि येणारे अडथळे लक्षात घेता ही मुदत पुन्हा ३० एप्रिल २०२६ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.




### इराणने होर्मुझ मार्ग पुन्हा बंद केला
**तेहरान ।** इस्रायलने बुधवारी लेबनॉनमधील अनेक ठिकाणी हवाई हल्ले केले. या हल्ल्यांमध्ये २५४ जण ठार झाले आणि १,१६५ जण जखमी झाले. लेबनॉनच्या नागरी संरक्षण पथकानुसार, मृतांमध्ये बेरूत, बालबेक, हर्मेल, नबातीह, आले जिल्हा, सिडॉन आणि टायर येथील रहिवाशांचा समावेश होता. इस्रायलच्या हल्ल्यानंतर इराणने होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा बंद केली आहे. यापूर्वी, दहशतवादी संघटना हिजबुल्लाहने इशारा दिला होता की, जर लेबनॉनला शस्त्रसंधीमध्ये सामील केले नाही, तर हा करार मोडला जाईल.

### किलर-मिलरची 'ती' चूक दिल्लीला पडली महागात
## शेवटच्या चेंडूवर गुजरातचा थरारक विजय!

वृत्तसंस्था । दिल्ली

**आयपीएल २०२६ च्या १४ व्या सामन्यात गुजरात टायटन्स संघाने थरारक विजय मिळवत हंगामातील आपले विजयाचे खाते उघडले आहे. सलग दोन पराभवानंतर दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात गुजरातने दिल्ली कॅपिटल्सचा अवघ्या १ धावेने पराभव केला.**



दिल्लीच्या मैदानावर प्रेक्षकांना श्वास रोखून धरायला लावणारा सामना पाहायला मिळाला. प्रथम फलंदाजी करताना गुजरात टायटन्सने ४ बाद २१० धावांचा डोंगर उभा केला होता. विजयासाठी २११ धावांचा पाठलाग करताना दिल्लीचा संघाला २० षटकांत ७ बाद २०९ धावांपर्यंतच मजल मारू शकला. शेवटच्या चेंडूवर विजयासाठी २ धावांची गरज असताना डेव्हिड मिलरला फटका मारता आला नाही आणि गुजरातने विजयावर शिक्कामोर्तब केला.

नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजीला आलेल्या गुजरातची सुरुवात संमिश्र झाली. साई सुदर्शन (१२) स्वस्त परतल्यानंतर जोस बटलर (५२) आणि शुबमन गिल (७०) यांनी दिल्लीच्या गोलंदाजांची पिसं काढली. या दोघांनी दुसऱ्या (पान २ वर)

## बारामती पोटनिवडणुकीतून कॉँग्रेसची माघार
### हर्षवर्धन सपकाळ यांची माहिती; कुणालाही पाठिंबा दिला नसल्याचं केलं जाहीर

वृत्तसंस्था । बारामती

**येथील पोटनिवडणुकीतून काँग्रेसने माघार घेतली आहे. काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर बारामतीची पोटनिवडणूक जाहीर झाली. ही पोटनिवडणूक २३ एप्रिल रोजी होणार आहे. या निवडणुकीत काँग्रेसने उमेदवार दिला होता. दरम्यान काँग्रेस आज काय करणार हे पाहणं महत्त्वाचं होतं कारण आज अर्ज मागे घेण्याची मुदत होती. आज अपेक्षेप्रमाणे काँग्रेसने माघार घेतली आहे.**

### ➢ हर्षवर्धन सपकाळ काय म्हणाले?



बारामती आणि राहुरीच्या पोटनिवडणुका महाराष्ट्रात आहेत. बारामतीकडे सगळ्यांचं लक्ष लागलं आहे. वैचारिक भूमिका म्हणून, भाजपाला असणारा विरोध करत असताना आणि निवडणूक आयोग भाजपाची बी टीम असल्याने आम्ही उमेदवार दिला होता. बारामती आणि राहुरी या ठिकाणी आम्ही अर्ज भरला होता. १५ मार्चला आम्ही ती भूमिका घेतली होती. आकाश मोरेंनी हा अर्ज बारामतीसाठी भरला होता. मित्र पक्ष निवडणूक लढवत नसल्याने आम्ही हा निर्णय घेतला. ६ एप्रिलला आम्ही अर्ज दाखल केला होता. अजित पवार हे महाराष्ट्राचे मोठे नेते होते. त्यांचं अपघाती निधन महाराष्ट्राला चटका लावणारं आहे. त्यामुळे आम्हाला जी भावनिक साद देण्यात आली त्याचा विचार आम्ही केला. या निवडणुकीत काँग्रेसने उमेदवार देऊ नये म्हणून आम्हाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने विनंती केली. सुनेत्रा पवार यांनी फोन केला होता. बुधवारीही त्यांनी फोन केला होता. अजित पवारांशी काँग्रेसचं असलेलं जे नातं होतं त्या भावना त्यांनी व्यक्त केल्या, आजही संपर्क केला. अजित पवार राष्ट्रवादी पक्षाचे विविध नेतेही आम्हाला भेटले. छगन भुजबळ यांनीही फोन करुन कळकळीने उमेदवार मागे घेण्याची विनंती केली. धनंजय मुंडे यांनीही फोनवरुन आम्हाला विनंती केली. ज्यानंतर आम्ही बारामतीच्या पोटनिवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे.

**आम्हाला घातली भावनिक साद**
आमच्या विविध नेत्यांशी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी संपर्क साधला. तसंच आज रोहित पवार हे आमच्या मित्र पक्षाचे नेतेही आले. या निवडणुकीत अजित पवारांसाठी तुमची सहकार्याची भावना असू द्या (पान २ वर)

# मुक्ताईनगरात केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी केली पीक नुकसानीची पाहणी
## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिले मदतीचे आश्वासन

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यातील रावेर लोकसभा मतदारसंघात २ एप्रिल रोजी अवकाळी पाऊस, जोरदार वादळी वारे आणि गारपिटीमुळे केळी बागांचे मोठ्याप्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी मुक्ताईनगर तालुक्यातील अंतुर्ली परिसराला प्रातिनिधीक भेट देत परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेतला. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांनी त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. तातडीने मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले.**



जळगाव जिल्ह्यात २ एप्रिल रोजी ८४९० हेक्टरवरील विविध पिकांचे नुकसान होऊन ४३० गावांमधील १३ हजार ४६६ शेतकरी बाधित झाले होते. नैसर्गिक आपत्तीमुळे विशेषतः २७९२ हेक्टरवरील केळी बागांचे मोठे नुकसान झाल्याची नोंद घेतली गेली. अनेक ठिकाणी ज्वारी, बाजरी, मका, ऊस, भाजीपाला, फळे यासारखी पिके जमीनदोस्त झाली असून, शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणावर झाले आहे. यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांवर दुहेरी संकट ओढवले आहे. मुक्ताईनगर तालुक्यातही २ एप्रिल रोजी सुमारे २८४५ हेक्टरवरील पिकांचे नुकसान होऊन २६ गावांमधील ४ हजार २५२ शेतकरी बाधित झाले (पान २ वर)

पाहणीदरम्यान केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्याकडून महसूल आणि कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांकडून नुकसानग्रस्त क्षेत्राचा तपशीलवार आढावा घेण्यात आला. आतापर्यंत करण्यात आलेल्या पंचनाम्यांची माहिती घेताना मंत्री खडसे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना नुकसानीचे अचूक मूल्यांकन करून अहवाल तातडीने सादर करण्याच्या सूचना दिल्या.

## भोंदूबाबा खरातचा कबुलीनामा : मी सांगितलं ते सर्व थोतांडच होतं!

वृत्तसंस्था । नाशिक

**महिला लैंगिक शोषणाच्या दोन गुन्ह्यात भोंदूबाबा अशोक खरात आतापर्यंत २१ दिवस पोलीस कोठडीत होता. अंकशास्त्र आणि ईशानेश्वर मंदिराच्या माध्यमातून खरातने दिग्गज राजकीय नेते, बडे शासकीय व पोलीस अधिकारी आणि उच्चभ्रू वर्गातील अनेकांना भुलवले. महिनाभरापूर्वी अलिशान आयुष्य जगणारा खरात काही काळ पोलीस कोठडीत राहिल्यानंतर सुतासारखा सरळ झाला आहे. आपल्या भूलथापा लोकांना कशा पटल्या, असा प्रश्न देखील आता खुद्द त्याला पडला आहे. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या एसआयटीतील अधिकाऱ्यांसमोर त्याने ते बोलूनही दाखवले.**



महिला अत्याचार प्रकरणी दाखल दुसऱ्या गुन्ह्यात खरातला न्यायालयीन कोठडी मिळाली. आता तिसऱ्या गुन्ह्यात त्याला अटक केली जाणार आहे. सात महिन्याच्या गर्भवतीवर अत्याचार केल्या प्रकरणी त्याला गुरुवारी न्यायालयात हजर केले जाईल. पीडितेच्या पतीने या संदर्भात तक्रार दिली आहे. भोंदूबाबाने त्याला सातव्या महिन्यात वाईट व दृष्ट शक्तींपासून गरोदर स्त्रीला खूप सांभाळावे लागते. मी एक विधी करेल, ज्यामुळे तुझ्या पत्नीवर दृष्ट शक्तींचा परिणाम होणार नाही आणि तिचे बाळंतपण सुरळीत होईल. तुझ्या बायकोला मुलगाच होण्यासाठी (पान २ वर)

# संपादकीय

## सेमी-इंग्लिश सामाजिक चढाओढ

महाराष्ट्रातील मराठी माध्यमाच्या शाळांना सेमी-इंग्लिशकडे वळवण्याचा सध्याचा प्रवाह हा केवळ शैक्षणिक प्रयोग म्हणून पाहणे ही मोठी चूक ठरेल. तो आपल्या शिक्षणव्यवस्थेतील प्राधान्यक्रम, सामाजिक आकांक्षा आणि धोरणात्मक गोंधळ यांचे प्रतिबिंब आहे. गेल्या काही दशकांत इंग्रजी भाषेला रोजगार, प्रगती आणि आधुनिकतेची भाषा म्हणून उंचावण्यात आले आहे. परिणामी, इंग्रजी येणे म्हणजे यशस्वी होण्याची हमी, असा एक सर्वमान्य समज समाजात पक्का झाला आहे. या समजुतीच्या पायावर सेमी-इंग्लिशसारखे धोरण उभे राहते, जे वरकरणी समतोल वाटत असले, तरी त्यामागील तत्त्वज्ञान अस्पष्ट आहे. शिक्षणाचा केंद्रबिंदू भाषा असावी की समज, हा मूलभूत प्रश्न इथे दुर्लक्षित केला जातो. राज्यानेही या प्रवाहाला विरोध करण्याऐवजी त्याला मान्यता देत, एक प्रकारे इंग्रजीकरण हाच दर्जेदार शिक्षणाचा मार्ग आहे, असा अप्रत्यक्ष संदेश दिला आहे. हे केवळ भाषेचे राजकारण नाही, तर संधींच्या वितरणाशी संबंधित व्यापक सामाजिक वास्तव आहे. धोरणीय पातळीवरही सातत्याचा अभाव स्पष्ट दिसतो. एकीकडे मातृभाषेतून शिक्षण देण्यावर भर देणाऱ्या राष्ट्रीय धोरणांची घोषणा होते, तर दुसरीकडे राज्यस्तरावर सेमी-इंग्लिशला प्रोत्साहन दिले जाते. जिल्हा परिषद शाळांमध्ये काही वर्षांपूर्वी सुरू झालेले सेमी-इंग्लिश बंद करण्याचा निर्णय घेतला गेला आणि आता पुन्हा त्यालाच चालना दिली जात आहे. ही धोरणातील दुटप्पी भूमिका शिक्षण क्षेत्रात संभ्रम निर्माण करते. शिक्षण हे प्रयोगशाळा नाही, जिथे वारंवार प्रयोग करून पाहता येतात; येथे प्रत्येक निर्णयाचा परिणाम थेट विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर होतो. त्यामुळे अशा बदलांकडे केवळ लोकप्रियतेच्या दृष्टीने न पाहता, त्यांच्या दीर्घकालीन परिणामांचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. अन्यथा, धोरणे ही अल्पकालीन राजकीय समाधान देणारी साधने बनतात आणि शिक्षणाचा मूळ उद्देश मागे पडतो. पालकांच्या अपेक्षा या बदलाच्या केंद्रस्थानी आहेत, पण त्या अपेक्षा माहितीपूर्ण नसून आकांक्षात्मक अधिक आहेत. इंग्रजी येणे म्हणजे चांगले शिक्षण आणि चांगले शिक्षण म्हणजे चांगले भविष्य ही सरधोपट मांडणी अनेक कुटुंबांमध्ये दृढ झाली आहे. विशेषतः ग्रामीण आणि निम्न-मध्यमवर्गीय कुटुंबांमध्ये सेमी-इंग्लिश हे सामाजिक चढाओढीचे साधन म्हणून पाहिले जाते. मात्र, वास्तव वेगळे चित्र दाखवते. भाषिक वातावरण, शिक्षकांची तयारी आणि शैक्षणिक साधनांची उपलब्धता या सर्व बाबींकडे दुर्लक्ष करून केवळ माध्यम बदलल्याने शिक्षणाचा दर्जा उंचावत नाही. उलट, अनेक विद्यार्थी ना मराठीत सक्षम होतात ना इंग्रजीत. परिणामी, शिक्षण हा ज्ञानाचा प्रवास न राहता केवळ परीक्षेपुरता मर्यादित राहतो. ही स्थिती पालकांच्या अपेक्षा आणि मुलांच्या प्रत्यक्ष क्षमतेमध्ये दरी निर्माण करते. या प्रक्रियेतील सर्वात कमकुवत कडी म्हणजे शिक्षक. सेमी-इंग्लिशचा यशस्वी अंमलबजावणीसाठी शिक्षकांचे भाषिक आणि अध्यापन कौशल्य अत्यंत महत्त्वाचे आहे. मात्र, वस्तुस्थिती अशी आहे की बहुतांश शिक्षकांना या बदलासाठी आवश्यक ते प्रशिक्षण आणि संसाधने उपलब्ध करून दिलेली नाहीत. शिक्षकांना इंग्रजीतून अध्यापन करण्याची अपेक्षा ठेवली जाते, पण त्यासाठी आवश्यक आत्मविश्वास, सराव आणि शैक्षणिक आधार दिला जात नाही. परिणामी, वर्गात अध्यापन हे भाषांतराच्या पातळीवर अडकते. संकल्पना स्पष्ट करण्याऐवजी शब्दांचे रूपांतर केले जाते. ही पद्धत विद्यार्थ्यांच्या आकलनाला मदत करत नाही, उलट त्यांना अधिक गोंधळात टाकते. शिक्षक स्वतःच अनिश्चित असतील, तर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास कसा वाढणार? त्यामुळे हा प्रश्न केवळ भाषेचा नसून शिक्षक सक्षमीकरणाचा आहे. शिक्षकांना सक्षम केल्याशिवाय कोणतीही सुधारणा प्रभावी ठरणार नाही.

# दुर्गम भागातील आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधांची पाहणी

## अनुसूचित जमाती कल्याण समितीची शहादा, तळोदा तालुक्यांना भेटी, सोयीसुविधांचा घेतला आढावा

प्रतिनिधी । तळोदा

**आदिवासीबहुल तळोदा आणि शहादा तालुक्यात बुधवारी विधानमंडळाच्या अनुसूचित जमाती जनकल्याण समितीचा महत्त्वपूर्ण पाहणी दौरा पार पडला. दुर्गम भागातील आरोग्य सेवा, शिक्षणाचा दर्जा आणि आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. या दौऱ्याचा मुख्य उद्देश सरकारी योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचतात की नाही, हे तपासणे हा आहे.**

या पाहणी दौऱ्यात समितीचे गटप्रमुख आ. शांताराम मोरे, आ.राजेश पाडवी, आ. रामदास मसराम, साक्रीच्या आ. मंजुळा गावित, आ. उमा खोपरे यांचा समावेश आहे. समितीने प्रामुख्याने उपजिल्हा रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि आश्रमशाळांना भेटी दिल्या. आरोग्य विभागाचा आढावा घेताना सिकलसेल रुग्ण तपासणी, लसीकरण आणि गरोदर मातांना मिळणाऱ्या सोयी-सुविधांबाबत सविस्तर माहिती घेतली. तसेच, आमच्या मतदारसंघातील दुर्गम भागातील प्रश्न मार्गी लावण्यासाठी हा दौरा महत्त्वाचा आहे. आरोग्य आणि शिक्षणाच्या क्षेत्रात गुणात्मक बदल घडवून आणण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. आ.राजेश पाडवी यांनी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय, जेवणाचा दर्जा आणि





शैक्षणिक साहित्याच्या उपलब्धतेची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या दुर्गम पाड्यांवरील रस्ते, पिण्याच्या पाण्याची सोय आणि घरकुल योजनेच्या प्रगतीबाबत समितीने प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून अहवाल मागवला. विकास कामात कोणत्याही प्रकारची हयगय सहन केली जाणार नाही, अशा स्पष्ट सूचना यावेळी देण्यात आल्या. दौऱ्यावेळी विधान भवन मुंबई समितीतील अधिकारी, आदिवासी विकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महसूल आणि पंचायत समितीचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.तळोदा तालुक्यातील सलसाडी आश्रमशाळा येथे विद्यार्थ्यांच्या सुविधा व शैक्षणिक वातावरणाबाबत चर्चा करण्यात आली. बोरद येथे शबरी घरकुल योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या घरांची पाहणी करून लाभार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधा आणि अंमलबजावणीतील अडचणींचा आढावा घेण्यात आला. या पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटी दूर करून सोयी-सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी समिती सरकारकडे शिफारस करेल,असे आ. शांताराम मोरे यांनी सांगितले.

### शैक्षणिक व क्रीडा अन् आरोग्य सुविधांची तपासणी

शहादा तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाची या समितीने पाहणी केली. रुग्णालयातील वैद्यकीय सेवा, उपकरणे, बेडची उपलब्धता व उपचार प्रक्रियेचा अभ्यास करण्यात आला. सुलतानपूर येथील एकलव्य मॉडेल आश्रमशाळेत विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध निवासी, शैक्षणिक व क्रीडा सुविधा तपासण्यात आल्या. कोचरा येथील अनुदानित आश्रमशाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांची उपस्थिती, शिक्षकांची संख्या, पायाभूत सुविधा आणि शैक्षणिक दर्जा याची माहिती घेण्यात आली. या पाहणीदरम्यान समिती सदस्यांनी शाळा व रुग्णालयातील सुविधा, कार्यान्वयनाची स्थिती, तसेच येणाऱ्या तांत्रिक अडचणींबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या सूचना देत आदिवासी भागातील सेवा अधिक दर्जेदार करण्यावर भर देण्यात आला. हा दौरा आदिवासी भागातील विकास कामांना गती देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

### मूलभूत सुविधांचा आढावा

तळोदा तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाला भेट देऊन रुग्णसेवा, डॉक्टर व कर्मचाऱ्यांची उपलब्धता, औषध साठा, उपकरणांची स्थिती याची तपासणी केली. त्यानंतर आदिवासी विकास विभागाच्या शिवे येथील आश्रमशाळेत विद्यार्थ्यांच्या राहणीमान, भोजन व्यवस्था, शैक्षणिक गुणवत्ता आणि मूलभूत सुविधांचा आढावा घेण्यात आला. या पाहणीत अनुसूचित जमाती जनकल्याण समिती ही आदिवासी समाजासाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांची अंमलबजावणी प्रत्यक्ष तपासण्यासाठी कार्य करते. शिक्षण, आरोग्य, निवास, पायाभूत सुविधा, रोजगार व सामाजिक विकासाशी संबंधित योजनांची स्थिती जाणून घेऊन आवश्यक त्या सूचना शासनाला देणे हा समितीचा प्रमुख उद्देश आहे. तसेच चिळमाळ येथील साकव पुलाची पाहणी करून वाहतुकीसाठी असलेली गरज व सुरक्षिततेबाबत सूचना देण्यात आल्या.

# नवापूर येथे रविवारी रंगणार भीमगीतांची जुगलबंदी

प्रतिनिधी । नवापूर



**महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त नवापूर शहरात भव्य व प्रबोधनात्मक भीमगीतांचा कार्यक्रम दि. दि. १२ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ, नवापूर येथे आयोजित करण्यात आला आहे.**

सोशल डेव्हलपमेंट फाउंडेशन, नवापूर व समस्त आंबेडकर अनुयायी यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायक मनोज निकम (नांदगाव) आपल्या प्रभावी आवाजातून भीमगीतांची सादरीकरण करणार आहे. उपस्थितांना सामाजिक जागृतीचा संदेश देणारी ही मैफल ठरणार आहे. कार्यक्रमात प्रज्ञा, शील व करुणा या विचारधारेवर आधारित प्रबोधनात्मक सादरीकरणही करण्यात येणार आहे. या निमित्ताने शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अध्यक्ष चंद्रकांत नगराळे, ॲड. राहुल शिरसाठ यांच्यासह सोशल डेव्हलपमेंट फाउंडेशनच पदाधिकारी व आंबेडकर अनुयायी परिश्रम घेत आहेत. सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमाला नवापूर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# जातपात विसरुन केवळ हिंदू म्हणून एकजूट व्हा !

## आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेचे अध्यक्ष डॉ.प्रवीण तोगडीया यांचे आवाहन

प्रतिनिधी। धुळे

**दोन हजार वर्षांपूर्वी विश्वात केवळ हिंदूच अस्तित्वात होते. मात्र, आता हिंदूची संख्या कमी होत आहे. त्यांना मारले जात असून बाटवले जात आहे. त्यामुळे जातपात विसरुन केवळ हिंदू म्हणून एकजुट व्हा. अन्यथा पुढील धोक्यापासून तुम्हाला कोणीही वाचवू शकणार नाही. देशात कायमस्वरुपी हिंदूंचा अंमल हवा असेल तर आताच सावध व्हावे लागेल, असा निर्वाणीचा इशारा आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेचे अध्यक्ष डॉ. प्रविण तोगडीया यांनी दिला.**

यावेळी राजेंद्र खंडेलवाल, पवन





आला. डॉ. तोगडीया पुढे म्हणाले की, आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेचे अध्यक्ष पलीकडे जावून आम्ही हिंदू आहोत ही भावना मनात रुजवली पाहिजे. भारतात कायमस्वरुपी हिंदूंचे अंमल राहण्यासाठी हिंदूंनी प्रयत्नशील राहिले पाहिजे. हे राष्ट्र सुरवातीपासूनच हिंदूचे आहे. मुस्लिमांची लोकसंख्या वाढू नये येथे यासाठी जनसंख्या नियंत्रण कायदा तयार करण्याची गरज आहे. हिंदूनी केवळ हिंदूकडूनच सर्व प्रकारची खरेदी करावी, हिंदूनाच रोजगार द्यावा. हिंदूंच्या अन्न गोळा केले जाते. अशा पध्दतीने देशातील एक कोटी घरातून एक मुठ अन्न गोळा करत आहे. तसेच एक करोड हिंदूंची मोफत आरोग्य तपासणी करण्याचा संकल्प आहे. आपली मुले शिक्षणात पुढे जावी म्हणूनही आंतरराष्ट्रीय हिंदू परिषद प्रयत्नशील आहे. नोकरी नाही आणि मतदानाचा अधिकारही राहणार नाही. तसेच तीन कोटी बांगलादेशींना पळवून लावले जाईल, धर्मांतर बंदी कायदा केला जाईल, असे डॉ. डॉ. प्रविण तोगडीया यांनी सांगितले.

# पान १ वरुन

### शेवटच्या चेंडूवर गुजरातचा......

विकेटसाठी ३२ चेंडूत ६० धावा जोडल्या. बटलर बाद झाल्यावर गिलने वॉशिंग्टन सुंदर (५५) सोबत १०४ धावांची शतकीय भागीदारी केली. या त्रिकुटाच्या अर्धशतकांमुळे गुजरातने २१० धावांचा टप्पा ओलांडला. शेवटच्या ओव्हरचा थरार - शेवटच्या १२ चेंडूत दिल्लीला ३६ धावांची गरज होती. १९ व्या षटकात मोहम्मद सिराजला डेव्हिड मिलर (४१) आणि विप्राज निगम यांनी २३ धावा कुटल्या. शेवटच्या षटकात १३ धावा हव्या असताना प्रसिद्ध कृष्णाने विपराजला बाद केले. तिसऱ्या चेंडूवर सिंगल आणि चौथ्यावर षटकार बसल्याने सामना रंगतदार झाला. मात्र, शेवटच्या दोन चेंडूंवर मिलरला मोठे फटके मारता आले नाहीत आणि दिल्लीची विजयाची हॅट्ट्रिक हुकली.

### बारामती पोटनिवडणुकीतून......

असं त्यांनी सांगितलं. काँग्रेसने अजितदादांच्या अपघाताबाबत जी भूमिका घेतली त्याचंही रोहीत पवार यांनी समर्थन केलं. काही हास्यास्पद वक्तव्य, अपरिपक्व वक्तव्यंही आमच्या विरोधात करण्यात आली. पण रोहित पवार यांनी त्याबाबतही कुटुंब म्हणून दिलगिरी व्यक्त केली. सुप्रिया सुळे यांनीही त्यांच्या भावना बोलून दाखवल्या, शरद पवार यांनीही आम्हाला सल्ला दिला. पक्षश्रेष्ठींशीही त्यांचं बोलणं झालं. त्यांच्या भावनाही आम्हाला समजली. या सगळ्या गोष्टींसह आमची वरिष्ठ नेत्यांशी आमची चर्चा झाली. ही निवडणूक लढलीच पाहिजे अशी आमची भूमिका होती. पण सामंजस्य, सभ्यता आणि संस्कृती म्हणून आम्हाला जी साद घातली गेली. अजितदादा काँग्रेस पक्षासह दीर्घकाळ होते ही बाबही आम्ही विचारात घेतली. या सगळ्या पार्श्वभूमीवर जो विचार समोर आला त्यानुसार आम्ही बारामतीच्या पोटनिवडणुकीतून माघार घेतली आहे असं हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितलं आहे. आमचा उमेदवार बारामतीत उभा राहणार नाही. आमच्या उमेदवाराची माघार आम्ही घेत आहोत. सभ्यता आणि संस्कृती पाळून आम्ही हा निर्णय घेतला आहे.

### भोंदूबाबा खरातचा कबुलीनामा......

एक विधी करेल, अशा भुलथापा दिल्या होत्या. तक्रारदार पत्नीला घेऊन आला असता भोंदूबाबाने तिच्यावर अत्याचार केले. ही बाब पीडितेने सांगितल्यावर तक्रारदार पतीने भोंदूबाबाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यास सुरुवात केली. खरात केबीनमध्ये काय करतो, हे बघण्यासाठी त्याने मित्राच्या मदतीने सीसीटीव्ही कॅमेरा बसवला. केबीनमधील छायाचित्रण त्याने नंतर पेनड्राईव्हमध्ये काढून घेतले. अनेक महिला व मुलींबरोबर खरात गुंगीकारक पदार्थ व द्रव्य देऊन त्यांना मोहित करून अत्याचार करीत होता. खरातची दुष्कृत्ये उघड करण्यात सीसीटीव्हीच्या चित्रफिती महत्वाच्या ठरल्या.

दोन पेन ड्राईव्हमधील या चित्रफिती तपास यंत्रणेकडे असल्याचे सांगितले जाते. एसआयटीच्या तपासात संशयित खरातने पीडिता आणि त्यांच्या कुटुंबाच्या श्रद्धेचा गैरफायदा घेऊन, भीती दाखवून, खडे, चिंचुके, रुद्राक्ष, पूजा, विधी आदी माध्यमातून पैसे उकळले, असे निष्पन्न झाले. अंगात दैवी शक्ती असल्याचे भासवून, कुटुंबियांच्या मृत्युची भीती दाखवून महिलांचे त्याने लैंगिक शोषण केले. सिन्नरच्या ईशानेश्वर मंदिरात अंधारात हातचलाखीने दैवी शक्ती असल्याचे भासवून अंधश्रध्दा पसरवण्याचे काम केले. ठोकताळ्याच्या आधारे तो काहीतरी सांगायचा. यातील काही गोष्टी खऱ्या निघायच्या. मग अशा भक्तांकडून त्याचा प्रचार झाला. त्याच्याकडे येणाऱ्यांमध्ये संपर्कातून (रेफरन्सने) येणाऱ्यांचा समावेश होता. बनावट खडे महागड्या किंमतीला विकून लुबाडल्याची माहिती कुणाकडून दिली गेली तरी बाबाला समजेल म्हणून भक्तांनी मौन बाळगले होते. पोलीस कोठडीत काही दिवस काढल्यानंतर भोंदूबाबा खरातने 'आपण जे सांगत होतो ते सर्व थोतांड होते, लोकांना कसे पटले, हेच मला समजत नाही, असे तपासादरम्यान म्हटल्याचे एसआयटीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

### अवकाळीचा तडाखा! मुक्ताईनगरात......

होते. कृषी विभागाने घेतलेल्या नोंदीनुसार, मुक्ताईनगरात सुमारे १९५१ हेक्टरवरील केळी बागांचे नुकसान झाले असून, इतरही बऱ्याच पिकांची हानी झाली आहे. तसेच शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांद्वारे मदत मिळवून देण्यासाठी प्रक्रिया गतीने पूर्ण करण्याचे निर्देशही दिले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी थेट संवाद साधताना त्यांनी शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहील, असा विश्वास व्यक्त केला. केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून शक्य तितक्या लवकर आर्थिक मदत, पीक विमा लाभ आणि इतर सहाय्य मिळवून देण्यासाठी आपण स्वतः पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच शेतकऱ्यांना धीर देत या संकटातून लवकर सावरण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन दिले. केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या या दौऱ्यात स्थानिक भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी सहभागी झाले होते. नुकसानग्रस्त भागातील परिस्थिती पाहता तातडीने मदतकार्य सुरू करण्याची गरज असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले.

# जळगावात अतिक्रमणातील भेदभावाविरोधात मनसे आक्रमक

प्रतिनिधी । नंदुरबार

**शहरातील अतिक्रमण कारवाईत होत असलेल्या कथित भेदभावाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने जळगाव महानगरपालिकेच्या आयुक्तांना निवेदन देत प्रशासनाला जाब विचारला आहे. खोटे नगर ते कालिका माता मंदिर या प्रमुख मार्गावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले असून, विशेषतः परप्रांतीय व्यापाऱ्यांकडून रस्त्यावर विविध साहित्य विक्री सुरू असतानाही अतिक्रमण विभागाकडून त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप मनसेने केला आहे.**



या पार्श्वभूमीवर मनसेने हॉकर्स धोरणाबाबत सविस्तर भूमिका मांडत, शहरात नियोजित व कायदेशीर हॉकर्स झोन तातडीने निश्चित करण्याची मागणी केली आहे. या प्रसंगी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष ॲड जमील देशपांडे, महानगराध्यक्ष विनोद शिंदे, उप महानगराध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे, ललित शर्मा, चेतन पवार, प्रकाश जोशी, आशुतोष जाधव, राहुल चव्हाण, खुशाल ठाकूर उपस्थित होते.

# मन्यारखेडा येथे वैशाख स्नानासाठी भाविकांची गर्दी

प्रतिनिधी । जळगाव

**मन्यारखेडा येथील विश्वातील एकमेव मानले जाणारे ग्रह-राशी नक्षत्र मंदिर सध्या धार्मिक उत्साहाने गजबजले असून वैशाख स्नानासाठी हजारो भाविकांची गर्दी झाली आहे.**

या तीर्थकुंडांचे उद्घाटन डॉ. स्वामी सुमंताश्री महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. चारधाम, अष्टभुवैकुंठ, १२ ज्योतिर्लिंग आणि ६८ तीर्थांतील पवित्र माती व जल या कुंडांमध्ये विधीपूर्वक विसर्जित करण्यात आले असून त्यानंतर हे कुंड भक्तांसाठी खुले करण्यात आले. यामुळे या स्नानाला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

# ऐतिहासिक किल्ल्याचे भामेर गावात यात्रोत्सवाला ५० वर्षांची परंपरा

## मातृसत्तेचं प्रतिनिधित्व करणाऱ्या कुलदैवतांचं स्मरण; भवानी मातेचा यात्रोत्सव जल्लोषात साजरा

प्रतिनिधी । साक्री

**येथील भामेर गाव म्हटलं की, त्याचा इतिहास आणि इतिहासाची भुज राखणारं ते गाव. साक्री तालुक्यातील उत्तरेला माळरानावर वसलेलं भामेर हे गाव ऐतिहासिक किल्ल्याचे गाव. येथे भवानी मातेचा यात्रोत्सव गेल्या ५५ वर्षांपासून साजरा केला जातो, यंदाही तो मोठया उत्साहात आणि धार्मिक कार्यक्रमांनी साजरा झाला. या गावाची लोकसंख्या सुमारे चार हजार आहे. भारतातील लोकसंस्कृती ही मातृसत्ताक संस्कृती आहे. म्हणून आज महाराष्ट्रात नव्हे प्रत्येक ठिकाणी आपल्या मातृसत्तेचं प्रतिनिधित्व करणाऱ्या कुलदैवतांचं स्मरण करून यात्रोत्सव साजरा करण्यात आला.**





(छाया - अजय भामरे, अमळनेर)

भामेर या गावाचं वैशिष्ट्य म्हणजे एक गाव- एक संस्कृती- एक विचार असे आहे. या गावात गाव तिथे भानगडी हे स्वरूप नसून गाव तिथे शांती असे चित्र पाहण्यास मिळते. अगदीच मतभेद झाले तर मनभेद न होता, एकोपा साधला जातो.असं हे एक भामेर गावाचे वैशिष्ठे आहे.

या गावाचे सामाजिक चार स्तंभ आहेत. यात माळी, बौद्ध , भिल्ल आणि धनगर! या चार समाजाचा एकोपा आणि मानवतेच्या विचारांवर या गावाची जडणघडण घडली आहे. या गावातील सुशिक्षित तरुणांपासून ते वयोवृद्धांपर्यंत भावकीचे नाते आहे. त्यामुळे घरात जसे कपातलं वादळ उठतं अन् क्षणात शमते तसाच समज, गैरसमज मिटविले जातात. हे गाव मातृसत्ताक गाव असल्याने इथे भवानी मातेचा यात्रोत्सव गेल्या ५५ वर्षापासून सुरू आहे. या यात्रोत्सवामध्ये आबाल वृद्ध मोठा भक्ती भावाने आणि आनंदाने सहभागी झाले होते. यात्रोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी मानाचा तगत्राव संपूर्ण गावातून फिरवण्यात आला. येणाऱ्या सर्व भाविकांसाठी महाप्रसाद व भोजन व्यवस्था करण्यात आली होती. यात्रोत्सवात खेळणी, दुकाने, पाळणे आदींचे दुकाने थाटली होती. यात्रेच्या तिसऱ्या दिवशी कुस्त्यांची दंगल भरविण्यात आली होती. खान्देशात धुळे, नंदुरबार, जळगाव, बागलाण येथील नामांकित पहिलवान कुस्त्या खेळण्यासाठी आले होते. यात्रा उत्सवाची प्रमुख धुरा गावातील यात्रा उत्सव समिती प्रमुख तथा महात्मा ज्योतिराव फुले विद्या प्रसारक मंडळाचे विद्यमान अध्यक्ष सुभाष सोनवणे यांसह समिती पदाधिकारी, यात्रा उत्सव कमिटीत धनराज पाटील, लोटन सोनवणे, नाना सोनवणे, रामा सोनवणे, भगवान भामरे (माजी पोलीस पाटील) आदीं सहभागी झाले होते. पोलीस प्रशासनाच्या सहकार्यामुळे यात्रा उत्सव आनंदात पार पडला.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# जैन इरिगेशनमध्ये विश्व नवकार महामंत्र दिवस उत्साहात

## सहकाऱ्यांच्या सामूहिक जपातून विश्वशांतीची प्रार्थना

प्रतिनिधी । जळगाव

**जैन प्लास्टिक पार्क, जैन हायटेक प्लांट फॅक्टरी, जैन ॲग्री पार्क तसेच जैन फूड पार्क येथील जैन इरिगेशनच्या सहकाऱ्यांनी गुरुवारी विश्वनवकार महामंत्र दिन सामुहिकपणे मंत्र जपत उत्साहात संपन्न केला. सकाळी नियोजित वेळेत जैन इरिगेशन सिस्टीम्स लिमिटेडच्या विविध प्रकल्प परिसरात सामूहिक नवकार महामंत्र जप करण्यात आला. यामध्ये अधिकाऱ्यांसह सहकाऱ्यांनी मोठ्या संख्येने स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवून भक्तिमय वातावरण निर्माण केले.**



जैन प्लास्टिक पार्क, जैन हायटेक प्लांट, जैन एग्री पार्क तसेच जैन फूड पार्क येथे शिस्तबद्ध पद्धतीने सामूहिक जप करण्यात आला. यावेळी शांत, एकाग्र आणि आध्यात्मिक वातावरण अनुभवायला मिळाले. सहभागी सर्वांनी सामूहिक प्रार्थना करीत अहिंसा आणि विश्वशांतीचा संकल्प घेतला. या नमस्कार महामंत्राद्वारे कोणत्याही व्यक्तीची पूजा न होता गुणसमुच्चयाची पूजा साधली जाते. ह्या योगे आपल्या विकारांवर विजय मिळवीत निर्विकार होण्याचा मार्ग प्रशस्त होतो. ही प्रार्थना केवळ जैन धर्मियांची नसून सर्व मानव जातीला मिळालेली शाश्वत देणगीच आहे.

सामूहिक जपामुळे सकारात्मक ऊर्जा निर्माण होत असल्याचा अनुभव सहभागींकडून व्यक्त करण्यात आला. गेल्या वर्षापासून जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो)तर्फे संपूर्ण देशासह जगात ठिकठिकाणी विश्व नवकार महामंत्र प्रार्थनेचे आयोजन केले जाते. जैन इरिगेशन सिस्टीम्स लिमिटेडचे अशोक जैन यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. गतवर्षी झालेल्या विश्व नवकार महामंत्र सामूहिक जप उपक्रमात तब्बल ८१ हजार जणांनी विक्रमी सहभाग नोंदविला होता. यावर्षी सुद्धा अधिक संख्येने सहभाग नोंदविला गेला. जैन इरिगेशन सिस्टीम्स लि., जैन फार्मफ्रेश फूड्स लि. यांसारख्या उद्योग संस्थांनीही मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविला. सर्वधर्मीय बांधवांना सहभागी करून वर्तमान परिस्थितीत विश्वशांतीचा संदेश देण्याचा आयोजकांचा मुख्य उद्देश होय. नवकार महामंत्र दिनाच्या निमित्ताने जळगावात भक्ती, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

आगामी विश्व नवकार महामंत्र सामूहिक जप उपक्रमासाठीही या कार्यक्रमातून सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कंपनीतील विविध विभागांच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## फरशी पुलाच्या खड्ड्यात बुलेटसह कोसळल्याने युवक जागीच ठार



प्रतिनिधी । अमळनेर

**तालुक्यातील कळमसरे – शहापूर रस्त्याच्या सुरु असलेल्या फरशी पुलाजवळ बुलेट गाडीचा दि.७ रोजी रात्री भीषण अपघात होऊन युवक जागीच ठार झाल्याची घटना घडली.**

याबाबत सविस्तर वृत्त असे की,सुनील सीताराम शिंदे (वय २६ वर्षे रा.सोनगीर जि. धुळे) हा ६ रोजी कळमसरे येथे लग्नासाठी कुटुंबासोबत आला होता. हळदीचा कार्यक्रम आटोपून रात्री बुलेट ने घरी परतताना रात्रीच्या वेळेस शहापूर–कळमसरे दरम्यान सुरू असलेल्या फरशी पुलाच्या खड्ड्यात बुलेट समवेत जाऊन पडला. परिणामी खड्ड्यातील सिमेंट पाईपच्या कडेला मधोमध अडकल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. सकाळी ही घटना उघडकीस आली.

मारवड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जिभाऊ पाटील, पोलीस कर्मचारी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. मृतास शवविच्छेदन साठी ग्रामीण रुग्णालयात पाठवले. मयत सुनील शिंदे याच्या पच्यात वृद्ध आई, वडील, पत्नी एक मुलगी, एक मुलगा आहे.

## थोडक्यात

### श्री संत ज्ञानेश्वर विद्यालयात अभिप्राय संकलन

**जळगाव ।** श्री संत ज्ञानेश्वर विद्यालयात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ व अध्यापन प्रक्रिया अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने पालक व विद्यार्थ्यांकडून अभिप्राय संकलन उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमांतर्गत पालक व विद्यार्थ्यांना अभिप्राय फॉर्म देऊन अध्यापन पद्धती, विषय समज, शिक्षक-विद्यार्थी संवाद तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीविषयी मते जाणून घेण्यात आली. संकलित अभिप्रायाचे शिक्षक बैठकीत विश्लेषण करून अध्यापनात आवश्यक सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. या उपक्रमाचे मार्गदर्शन मुख्याध्यापक मुकेश नाईक यांनी केले तर पर्यवेक्षिका शीतल कोळी यांनी उपक्रमाचे नियोजन व समन्वय केले.

### उष्णतेच्या लाटेपासून उपाययोजना राबवा

**जळगाव ।** भारतीय हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यानुसार येत्या काही महिन्यांत तापमान सामान्यपेक्षा अधिक राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालय तसेच राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्राने उष्णतेच्या लाटेपासून कामगार व नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. अत्यंत उष्णतेच्या परिस्थितीत कामगार, मजूर तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्यविषयक धोका निर्माण होऊ शकतो. विशेषतः बांधकाम कामगार, वीटभट्टी कामगार, रोजंदारी मजूर तसेच असंघटित क्षेत्रातील कामगारांना उष्माघाताचा अधिक धोका असतो.

## जिल्ह्यात युरिया खतांची पहिली रेक दाखल

प्रतिनिधी । जळगाव

**खरीप हंगाम २०२६ च्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना रासायनिक खतांचा वेळेवर व पुरेसा पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत आवश्यक नियोजन करण्यात येत असून जळगाव जिल्ह्यात युरिया खतांची पहिली रेक दाखल झाली आहे.**



सदर रेकद्वारे जिल्ह्यासाठी एकूण २६५० मेट्रिक टन युरिया खत प्राप्त झाले असून हा पुरवठा राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ) कंपनीमार्फत करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी प्रत्यक्ष भेट देऊन खत साठ्याची पाहणी केली तसेच कंपनी प्रतिनिधी, वाहतूकदार व हमाल प्रतिनिधींशी संवाद साधून उतरवणूक व वितरण प्रक्रियेचा आढावा घेतला.

खत वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी सर्व विक्रेत्यांनी खतांची विक्री रिअल-टाईम सेल प्रणालीद्वारे तसेच आधार संलग्न - यंत्रणेद्वारेच करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले. तसेच खतांची साठवणूक, वाहतूक व विक्री प्रक्रियेत कोणतीही अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचनाही संबंधित यंत्रणांना यावेळी देण्यात आल्या.

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आवश्यक ते खत वेळेत, रास्त दरात व पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून सातत्याने नियोजन व पाठपुरावा करण्यात येत असल्याचेही यावेळी संबंधितांनी सांगितले.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले जयंतीनिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन

प्रतिनिधी । अमळनेर

**भारताचे संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा सखोल अभ्यास करण्यासाठी आणि सामाजिक परिवर्तनाचे शिल्पकार महात्मा जोतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त अमळनेरात भव्य निबंध व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.**



या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले यांचे जीवन व कार्य किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्य यापैकी एक विषय निवडणे आवश्यक आहे. निबंध स्पर्धेसाठी ८०० ते १००० शब्दांची मर्यादा ठेवली असून निबंध सादर करण्याची अंतिम तारीख १० एप्रिल २०२६ आहे. वक्तृत्व स्पर्धा १२ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार असून प्रत्येक स्पर्धकाला ८ मिनिटांचा कालावधी दिला जाणार आहे. विशेष म्हणजे, या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कोणतेही प्रवेश शुल्क आकारले जाणार नाही आणि ही स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे.स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक पारितोषिके व प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत. प्रथम पारितोषिक १०००रु., द्वितीय ७५०रु. आणि तृतीय ५००रु. असे बक्षीस वितरण होणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी व अधिक माहितीसाठी प्रा.अशोक पवार (९४२२२७८२५६), हृदयनाथ मोरे (९४२१५१२०८५), यांच्याशी संपर्क साधावा.

## फिरती लोक अदालत म्हणजे न्याय आपल्या दारी

### कायदेविषयक सल्ला शिबिरात ॲड.अर्जुन पाटील यांचे मार्गदर्शन



प्रतिनिधी । बोदवड

**नाडगाव (ता. बोदवड) येथे ग्रामपंचायतीच्या प्रांगणामध्ये आज फिरत्या लोक अदालतीचे आणि मोफत कायदेविषयक सल्ला शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या अभिनव उपक्रमात न्यायालय व कायदे व्यवस्था थेट गावापर्यंत पोहोचल्याने ग्रामस्थांनी मोठा प्रतिसाद दिला. या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान बोदवड न्यायालयाचे न्यायाधीश ए. पी. खोल्लम यांनी भूषविले.**

या कार्यक्रमाची प्रस्तावना ॲड. धनराज प्रजापती यांनी केली. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोदवड वकील संघाचे अध्यक्ष ॲड. अर्जुन पाटील उपस्थित होते. तसेच मंचावर ॲड. के.एस.इंगळे, वकील संघाचे कोषाध्यक्ष ॲड. किशोर महाजन, पोलीस उपनिरीक्षक गजानन रहाटे, सरपंच प्रतिनिधी नरेंद्र कुरपाडे, नाडगावच्या पोलीस पाटील प्रियंका भंगाडे, विकलांग संघटनेचे अध्यक्ष धनराज गायकवाड आणि कायद्याचे विद्यार्थी परशुराम पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

**दुभंगलेली मने जुळवण्याचे काम लोक अदालतीचे!**

यावेळी प्रमुख मार्गदर्शन करताना ॲड. अर्जुन पाटील यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून उपस्थितांना कायद्याची सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले की, फिरती लोक अदालत म्हणजे न्याय आपल्या दारी! अदालतीचा मुख्य उद्देश समाजातील दुभंगलेली मने पुन्हा जुळवणे आणि तडजोडीअंती वाद कायमचे मिटवणे हा आहे,असेही त्यांनी सांगितले.

ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना ॲड. अर्जुन पाटील यांनी केवळ लोक अदालतीचे महत्त्वच सांगितले नाही, तर दैनंदिन जीवनाशी निगडित विविध कायद्यांवर प्रकाश टाकला. यामध्ये प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिकांचे कायदे व त्यांचे अधिकार, महिलांविषयक कायदे व संरक्षण, बालकांचे संरक्षण आणि हक्क, तसेच विधी सेवा प्राधिकरणांमार्फत सामान्य जनतेला दिल्या जाणाऱ्या विविध मोफत सेवा या संदर्भात अत्यंत सविस्तर व उपयुक्त माहिती दिली. या कायदेविषयक शिबिराला नाडगाव परिसरातील ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बोदवड तालुका विधी सेवा प्राधिकरणाचे अविनाश राठोड, बोदवड न्यायालयाचा सर्व कर्मचारी वर्ग, बोदवड पोलीस प्रशासन आणि नाडगावच्या ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

## पुस्तक वाचा, चर्चा करा आणि ज्ञान मिळवा आर.आर.बावस्कर

प्रतिनिधी । वरणगाव

**२१व्या शतकातील वेगवान तंत्रज्ञानाच्या युगात खेळ, एकत्र कुटुंब पद्धती आणि वाचन संस्कृती हळूहळू लुप्त होत चालली असून त्यामुळे मुलांमध्ये एकटेपणा वाढत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी विविध पुस्तकांचे वाचन करून त्यावर चर्चा करावी आणि त्यातून ज्ञान आत्मसात करावे, असे प्रतिपादन दीपनगर औष्णिक विद्युत प्रकल्पाचे सेवानिवृत्त मुख्य अभियंता आर. आर. बावस्कर यांनी केले.**



राधाकृष्ण श्री संत शिरोमणी गुरु रविदास सेवा ट्रस्ट, काहूरखेडा (ता. भुसावळ) यांच्या वतीने जिल्हा परिषद मराठी शाळा, वांजोळा येथे संत, समाजसुधारक व शास्त्रज्ञ यांच्यावरील पुस्तकांचे तसेच खाऊ वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास डॉ. संजीव भटकर, ट्रस्ट चे अध्यक्ष चावदस सपकाळे, मुख्याध्यापिका ज्योती वानखेडे, सुरेश नेमाडे आदी उपस्थित होते. आर. आर. बावस्कर पुढे म्हणाले की, आजच्या घडीला वाचन संस्कृती कमी होत असून विद्यार्थी क्रीडांगणापासूनही दूर गेले आहेत. त्यामुळे लहान वयातच विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे. विद्यार्थ्यांनी पुस्तक वाचनाबरोबरच खेळांमध्येही सक्रिय सहभाग घेतला पाहिजे.

**मोबाईल शाप की वरदान**

डॉ. संजीव भटकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, पूर्वी विज्ञान शाप की वरदान या विषयावर निबंध लिहिला जायचा; मात्र आता मोबाईल शाप की वरदान अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. एका क्लिकवर सर्व माहिती उपलब्ध होत असली तरी त्यामुळे विचारशक्ती आणि शोध घेण्याची वृत्ती कमी होत आहे. म्हणूनच मोबाईलचा मर्यादित वापर करून पुस्तक वाचनाची सवय लावणे गरजेचे आहे. सूत्रसंचालन व आभार सुरेश नेमाडे यांनी केले.

**➤ वाचनीय पुस्तकांचे वाटप**

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी संत, समाजसुधारक व शास्त्रज्ञ यांच्यावरील उपयुक्त पुस्तके वाटप करण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा करण्याचे आवाहनही करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप देखील करण्यात आले.

# भगवान श्री परशुराम जन्मोत्सवाची जय्यत तयारी पुर्णत्वाकडे

## रविवारी विराट मोटारसायकल रॅली; भव्य दिव्य परशुराम रथासह विराट शोभायात्रा

प्रतिनिधी । जळगाव

**सकल ब्राह्मण समाज एकजुटीची चळवळ भगवान परशुराम जन्मोत्सवाने जळगावातुन सुरू होऊन महाराष्ट्र भर पसरुन गावोगावी मोठ्याप्रमाणात जन्मोत्सवाचे आयोजन होत आहे. यात सर्व शाखा व भाषा भेद बाजुला सारुन वर्षातुन एकदा एका दिवशी एका ठिकाणी सकल ब्राह्मण समाजाने एकत्रित यावा याचा विशेष आग्रही बहुभाषिक ब्राह्मण संघ असतो.**



भगवान श्री परशुराम जन्मोत्सवाचे यंदा १७ वे वर्ष असुन लागोपाठ सतराव्या वर्षी देखील विशाल आयोजनाने जन्मोत्सव साजरा होणार आहे. या विशाल ब्राह्मण एकता मेळाव्याचे यशस्वीतेकरिता ४०० हुन अधिक स्वयंसेवक श्रमदान करीत असुन दानशुरांच्या अर्थ दानाने आयोजन यशस्वी केले जात आहे. यंदाच्या जन्मोत्सवाची सुरूवात रविवार, दिनांक ०५ एप्रिल रोजी रक्तदान शिबिराने संपन्न झाली. रविवार दिनांक १२ एप्रिल रोजी वातावरण निर्मीती करीता रोजी विराट मोटर सायकल रॅली सायं. ५ वा महाबळ चौकातुन हजारोंच्या संख्येत निघणार आहे. महाबळ चौकातुन रॅली पुढे काव्यरत्नावली चौक, रिंगरोड मार्गे शास्त्री टॉवर, सुभाष चौक, पांडे डेअरी चौक, विर सावरकर पुतळ्यावरून पोलिस मल्टीपरपज हॉलवर समापन होणार आहे. सायं. ७ वा. याच ठिकाणी दानदाते व श्रमदाते गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

ब्राह्मण एकता दिवसाचा मुख्य कार्यक्रम रविवार, दिनांक १९ एप्रिल रोजी सकाळी ९.०० वाजता परशुराम पुजन ग्राम दैवत श्री राम मंदिरात होऊन दुपारी ४.३० वाजता सुभाष चौकातुन निघणार आहे. शोभायात्रेत सालाबादा प्रमाणे भव्य दिव्य भगवान परशुराम रथा सह वाजतगाजत ढोल ताशा लेझिम व दांडिया पथकसह सहभागी होऊन धुम धडाक्याने हजारोंच्या सहभागाने विराट अशी शोभायात्रा निघणार आहे. शोभायात्रेत महिलांचे तलवार बाजजी दांडपट्टा प्रात्यक्षिकासह ढोल पथके, लेझीम व दांडीया पथके सहभागी होणार असुन पथकांच्या सरावाला हनुमान जयंती पासुन सुरूवात झाली असुन ते यंदाचे देखील आकर्षण राहणार आहे. विराट शोभायात्रेचे समापन शिवतिर्थावर होईल.

जन्मोत्सवात नाविन्यता आणणेस कल्पकतेने आगळे वेगळे उपक्रम सातत्याने साकारले जातात. मागील वर्षी तालुका स्तरावर समाज संगठीत व्हावा म्हणुन ९ तालुक्यांना भगवान परशुरामांच्या कायम स्वरुपी मुर्ती विनामुल्य देण्यात आल्या. यंदा देखील वेगळे पण राखत निमंत्रण पत्रिके ऐवजी तब्बल २८ पानी मराठी नववर्ष दिनदर्शिका शास्त्र शुद्ध तिथिसह प्रकाशित करण्यात आली आहे. दिनदर्शिकेत सर्व ब्राह्मणांच्या मुळ कुळ पुरूषाची माहीती प्रकाशीत केली आहे ज्यांच्या पासुन प्रत्येक शाखेची उत्पत्ती आहे. अनेक समाजोपयोगी माहीती दिनदर्शिकेत समाविष्ट असुन समाजात आपसात संपर्क वाढुन ऐकोपा घडावे असे या मागील उद्देश असल्याचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत खटोड यांनी सांगीतले. दिनदर्शिका प्रत्येक कुटुंबांपर्यत पोहचवली जात आहे. ज्यांना पोहचली नसेल त्यांचे करीता शिवतिर्थावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या शोभायात्रेत सकल ब्राह्मण समाज बंधु भगिनींनी हेच निमंत्रण समजुन सहभागी होण्याचे आवाहन अध्यक्ष माजी अध्यक्ष नितीन पारगावकर यांनी केले

आयोजनाचे यशस्वीते करीता सर्व पदाधिकारी, सभासद व कार्यकर्त्यांमध्ये खुप उत्साह असुन अतिशय जोमाने सर्व जण तयारीला लागल्याचेही सर्वांनी याठिकाणी नमूद केले. यदा भगवान श्री परशुराम जन्मोत्सव २०२६ च्या अंतर्गत वर्षभरात विवीध व्याख्यानाचे व स्नेह संन्मेलनाचे देखील आयोजन छत्रपती संभाजी महाराज नाट्यगृह व गंधे सभागृहात आयोजित करण्यात येणार असल्याचे अध्यक्ष ॲड ओम त्रिवेदी यांनी नवी पेठ येथील हनुमान मंदीरात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. बहुभाषिक ब्राह्मण संघाच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी विद्यमान अध्यक्ष प्रतिथयश विधीज्ञ ॲड ओम त्रिवेदी, संस्थापक अध्यक्ष श्रीकांत खटोड, माजी अध्यक्ष प्रतिथयश आर्किटेक्ट नितीन पारगावकर, सहसचिव पंकज पवनीकर, माजी अध्यक्ष सुरेंद्र मिश्रा, राजेश नाईक, शिव शर्मा, गोपाल पंडीत, व महिला संघाच्या संस्थापक अध्यक्षा सुधाताई खटोड, नूतन अध्यक्षा पूनम तिवारी, सचिव मानसी जोशी, प्रसिद्धी प्रमुख मनीष पात्रीकर उपस्थित होते.

# धरणगाव येथील शिक्षकाकडून अल्पवयीन विद्यार्थिनीचे लैंगिक शोषण

## पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

प्रतिनिधी । धरणगाव

**येथे एका खासगी माध्यमिक शाळेच्या शिक्षकाने अल्पवयीन विद्यार्थिनीचे सतत तीन वर्षे लैंगिक शोषण केल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी संशयिताविरोधात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी त्यास अटक करुन बुधवारी न्यायालयात हजर केले असता, दोन दिवसांच्या पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली.**

राहुल जगन्नाथ अहिरे (३२, रा. अमळनेर) असे पोलिसांनी अटक केलेल्या शिक्षकाचे नाव आहे. पीडित विद्यार्थिनी धरणगाव शहरातील



एका खासगी माध्यमिक विद्यालयात नववीच्या वर्गात शिकत असताना शिक्षक राहुल अहिरे याने तिच्याशी गोड बोलून मैत्री केली. त्यानंतर वेळोवेळी धरणगाव तसेच अमळनेर येथे तिचे लैंगिक शोषण केले. तसेच विद्यार्थिनीसोबत काही आक्षेपार्ह छायाचित्रे काढली. सदर छायाचित्रे समाज माध्यमावर प्रसारित करण्याची धमकी देऊन तो २०२२ ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत पीडित विद्यार्थिनीकडे वारंवार शरीर संबंधाची मागणी करून अत्याचार करत होता.

शिक्षकाकडून सुरू असलेला शारीरिक आणि मानसिक छळ पीडित विद्यार्थिनीला असह्य झाला होता. त्याच्याकडून वारंवार मिळणाऱ्या धमक्यांमुळे त्रस्त झाल्यानंतर अखेर तिने धाडस करून आपल्या आई-वडिलांना तिच्यासोबत घडलेला प्रसंग सांगितला. त्यामुळे संतप्त झालेल्या पीडितेच्या नातेवाईकांनी धरणगावमध्ये शिक्षकाला गाठून चोप दिला.

पीडित विद्यार्थिनीच्या आईने धरणगाव पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर संशयित शिक्षक राहुल अहिरे याच्याविरुद्ध मंगळवारी रात्री उशिरा धरणगाव पोलीस ठाण्यात बाललैंगिक अत्याचार प्रतिबंध कायद्यांतर्गत (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक सुनील पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक संतोष पवार पुढील तपास करत आहे. दुसऱ्या एका घटनेत शाळेत आणि खासगी शिकवणीसाठी जाणाऱ्या एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिची छेड काढणाऱ्या दोन टवाळखोरांविरुद्ध पाचोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# केळी पीकविमा घोटाळ्यातील खरे सूत्रधार, विमा कंपनीची सखोल चौकशी व्हावी

## शेतकरी कृती समितीची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी



प्रतिनिधी । चोपडा

**केळी पीकविमा योजनेत शेतकरीच घोटाळे करत आहेत, असे चित्र उभे केले जात असून वास्तवात पीकविमा कंपन्यांना १५ दिवस कागदपत्रे, स्वीकृतीसाठी ७ दिवस व अस्वीकृत प्रस्ताव दुरुस्तीसह मंजुरीकरिता ६० दिवस दिलेले असतात. मग विमा कंपन्यां प्रस्ताव मंजूर कोणत्या आधारे करतात? असा प्रश्न करीत या योजनेत एकूण लाभार्थी रकमेतील सगळ्यात मोठा नफा हा त्यांना होणार असतो. तरीदेखील एकटा शेतकरीच दोषी का? यात कंपनी व खरे सूत्रधार शोधून सर्वच दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी कृती समितीने जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.**

गेल्या काही वर्षात पैसे घेऊन विमा मंजूर झाल्याचे देखील वृत्त आहेत. त्यांनी शेतकऱ्यांना जाळ्यात ओढून आमिष दाखवून कागदपत्रे घेतले असण्याची देखील शक्यता आहे. लाखो रुपये पगार असणारे भ्रष्ट्राचार करत असतात. त्यामुळे गरीब शेतकरी त्यांच्या जाळ्यात अलगदपणे अडकले असावेत, अर्थात तेही चूकीचेच त्याचं समर्थन कृती समिती करीत नाही,असे स्पष्ट करीत खरे गुन्हेगार सोडून जे अडकले त्यांना व प्रामाणिक शेतकऱ्यांवर दोषी ठरवू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. तसेच द्राक्ष, डाळिंब वर्षात एकदाच येतात मात्र मृग व आंबिया दोघेही बहारात त्याचा विमा निघतो. मात्र वर्षभर लागवड होणाऱ्या केळी पीकविमा फक्त एकदाच का? का सरकारलाच ही योजना बंद करावयाची आहे ?अशी शंकाही त्यांनी उपस्थित केली. अचानक २८००० शेतकरी कसे वाढले?गुन्हा घडत असताना साऱ्यांना दिसत असताना तो रोखणे बाबत कुणीच का लक्ष दिले नाही?कायदे हे समाज हितासाठी असतात परंतु ईमानदार लोकांना कुणी संशयाने बघितले तरी त्यांना मेल्यासारखे होते.आज साऱ्याच निरापराध शेतकऱ्यांकडेही तसे बघितल जात असल्याने,पारदर्शी तपास होऊन असे घडणार नाही, यासाठी योजनेत दुरुस्ती व्हावी, अशी विनंती देखील शेतकरी कृती समितीने जिल्हाधिकारी यांच्याकडे केल्याची माहिती शेतकरी कृती समितीचे समन्वयक एस. बी. पाटील व प्रगतिशील शेतकरी भागवत महाजन यांनी दिली आहे.

## थोडक्यात

### चाळीसगावात अडीच लाखांचा गुटखा जप्त

**चाळीसगाव ।** धुळ्याकडून चाळीसगावकडे येणारा सुमारे २ लाख ४२ हजार रूपये किंमतीचा ९ गोण्या गुटखा व सुगंधीत तंबाखू चाळीसगाव शहर पोलीसांनी केलेल्या कारवाईत जप्त करण्यात आला. याप्रकरणी वाहनधारकाच्या विरोधात चाळीसगाव शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, धुळ्याकडून चाळीसगावकडे येणाऱ्या एमएच. १८ बीएक्स.१९११ या वाहनात गुटखा असल्याची माहिती शहर पोलीसांना मिळाली. पोलिसांनी सोमवारी सायंकाळी ७ ते ७.३० वाजेदरम्यान महाराणा प्रताप चौक येथे केलेल्या कारवाईत विमल गुटखा व सुगंधीत तंबाखू मिळून आला. गुटख्यासह वाहन जप्त करून पोलीस ठाण्यात आणण्यात आले. या कारवाईची माहिती अन्न व औषध प्रशासन जळगाव यांना दिल्यावर अधिकाऱ्यांनी पंचनामा केला असता, त्यात ९ गोण्यांमध्ये २ लाख ४२ हजार रूपये किंमतीचा गुटखा मिळून आला. या गुटख्यासह ६ लाख रूपये किंमतीचे वाहन असा सुमारे ८ लाख ४२ हजारांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

### विद्यापीठात संयुक्त जयंती महोत्सवाचे आयोजन

**जळगाव ।** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त दि. ११ ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत संयुक्त जयंती महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठ परिसरात सामाजिक समता, विचारप्रबोधन आणि बौद्धिक संवादाचा संगम घडवणारा हा महोत्सव ठरणार आहे. या संयुक्त जयंती महोत्सवांतर्गत चार दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात पोस्टर, चित्रकला, वक्तृत्व आणि काव्यवाचन अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

# विरवाडे येथे डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त शांतता समितीची बैठक

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील विरवाडे येथे चोपडा शहर पोलीस स्टेशनच्या मार्गदर्शनाने १४ एप्रिल २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शांतता कमिटीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला चोपडा शहर पोलीस स्टेशनचे पी.आय पोलीस निरीक्षक मधुकर साळवे स्वतः उपस्थित राहून मार्गदर्शन केले.**



यावेळी चोपडा पंचायत समितीचे माजी सभापती आत्माराम गोरख माळके तसेच पोलीस पाटील महारु कोळी, ग्रामपंचायत सदस्य विनोद युवराज शिरसाठ,भरत भीमराव शिरसाठ तसेच नाना उखर्डू वाघ व चोपडा शहर पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीत पोलीस निरीक्षक मधुकर साळवे यांनी संबोधित करताना जयंती संदर्भात योग्य ते मार्गदर्शन केले व जयंती उत्सव एकदम शांततेने साजरा करण्याचे आवाहन केले. तसेच आत्माराम माळके यांनीही मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन भरत भीमराव शिरसाठ यांनी केले. यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुपडू रतन गोलाईत,खजिनदार गौतम भिमराव बाविस्कर,, सचिव जितेंद्र युवराज शिरसाठ, सदस्य संदीप रावण सैंदाणे, राजेंद्र भीमराव शिरसाठ,दीपक मानकू सोनवणे, सुरेश आनंदा सोनवणे,समाधान शिवराम शिरसाठ व ग्रामस्थ उपस्थित होते.

# समाजकार्य महाविद्यालयाकडून मुळ्यावतार येथे विविध उपक्रम साजरे



प्रतिनिधी । चोपडा

**भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालयाच्या वतीने वर्षभर विविध कार्यक्रम राबविले जातात. नुकतेच मुळ्यावतार या आदिवासी डोंगराळ भागात टी वाय बीएस डब्ल्यू या वर्गाच्या विद्यार्थ्यांना समुदाय संघटन या तत्वाचा उपयोग करून ग्रामीण भागातील आदिवासी बांधवांच्या समस्या समजून जीवन कसे जगावे आणि दैनंदिन जीवन जगत असतांना कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते हे समजून घेऊन शिक्षणाची आवड निर्माण होण्यासाठी वाचनाची गरज म्हणून वाचनालयाची स्थापना करण्यास विविध उपक्रम राबविण्यात आले.**

समाजकार्य महाविद्यालयाच्या प्रा.मोहिनी उपासनी यांच्या संकल्पनेतून विविध योजनांची माहिती आणि विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड कशी निर्माण होईल, यासाठी टी वाय बीएस डब्ल्यूच्या विद्यार्थ्यांना सोबत मार्गदर्शन करण्यात आले. आदिवासी बांधवांमध्ये बालविवाह रोखण्यासाठी व बालविवाह का करू नये? यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. पर्यावरणाविषयी माहिती देण्यात आली. बेटी बचाव बेटी पढाव यावर मार्गदर्शन केले.

आदिवासी बोली भाषेतून मुलामुलींना डॉक्टर, वकील, इंजिनिअर, पोलीस यांचे फोटो दाखवून तुम्ही ही यांच्यासारखे जीवन बदलू शकतात. त्यासाठी शिक्षण महत्वाचे आहे,असे समजून सांगण्यात आले. क्षेत्रकार्य पर्यवेक्षक प्रा.डॉ.मोहिनी उपासनी यांनी विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून मुळ्यावतार हे आदिवासी डोंगराळ गाव निवडून समाजकार्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून जनजागृती केली. यासाठी त्यांना संस्थेच्या अध्यक्षा पूनम गुजराथी,आशिष गुजराथी,प्राचार्य सौंदानकर, उपप्राचार्य आशिष गुजराथी यांचे मार्गदर्शन लाभले. आणि सरपंच दत्ता पावरा आणि ग्रामस्थांनी या उपक्रमाबद्दल आभार व्यक्त केले.

# यावल येथे उद्या हिंदू संमेलन

प्रतिनिधी । यावल

श्री महर्षी व्यास नगरी यावल येथे हिंदू संमेलन दि. ११ एप्रिल २६ रोजी बालाजी मंदिर समोर, भुसावळ रोड येथे सायंकाळी ५ वाजता आयोजित करण्यात आले आहे. सकल हिंदू समाजात एकता, सामाजिक बंधुता दृढ व्हावी. तसेच हिंदू समाजातील जात भाषा आणि पंथ यांचा भेदभाव विसरून एकत्र करण्याच्या मुख्य उद्देशाने व सामाजिक समरसता आणि राष्ट्रभक्ती जागृत करण्यासाठी श्री महर्षी व्यास नगरी येथे विराट हिंदू संमेलनचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाला हभप ज्ञानेश्वर पाटील, (जळकेकर महाराज) तसेच श्री स्वामी ब्रह्मानंद श्री दत्त गिरणारी मठ भुसावळ आणि श्री स्वप्निलजी शशिकांत चौधरी जळगाव जिल्हा कार्यवाहक हे उपस्थित राहणार आहेत. या सभेला डॉ. गौतम खट्टर संस्थापक सनातन महासंघ दिल्ली हे संबोधित करणार आहेत. या कार्यक्रमाला सकल हिंदू समाजाने मोठ्या संख्येने उपस्थिती द्यावी, असे आवाहन सकल हिंदू समाज मित्र मंडळ परिवार यावल यांनी केले आहे.

# पंकज विद्यालयात केळी पिकाविषयी मार्गदर्शन




प्रतिनिधी । चोपडा

**पंकज विद्यालयाच्या प्राथमिक विभागात १५ एप्रिल केळी दिननिमित्त जागतिक केळी दिवस आरोग्य, पोषण आणि शेतीविषयक जाणीव रुजविणारा एक सुंदर उपक्रम समितीतर्फे जनजागृती राबवण्यात आला. यात केळी खा- निरोगी राहा, हा संदेश देत विद्यार्थ्यांना केळी व इतर फळांमधील पौष्टिक तत्वांची समृद्ध माहिती देण्यात आली.**

याप्रसंगी बहुगुणी केळी या विषयावर मार्गदर्शन करताना प्रगतिशील शेतकरी डा. रविंद्र निकम यांनी केळीचे आरोग्यदायी फायदे, त्यातील जीवनसत्त्वे, पोटॅशियम व ऊर्जा देणारे घटक यांचे महत्त्व अत्यंत प्रभावीपणे मांडले. त्याचप्रमाणे विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेश बोरोले यांनी विद्यार्थ्यांना संतुलित आहाराचे महत्त्व पटवून देत, दैनंदिन जीवनात फळांचा समावेश करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून आपली जिज्ञासा व्यक्त केली. या संवादातून विद्यार्थ्यांचे ज्ञान अधिक दृढ झाले. तसेच विद्यार्थ्यांना पोषणविषयक माहितीपत्रकांचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमाला आणखी गोडी लाभली ती म्हणजे मध्यान्ह भोजनांतर्गत आडगाव येथील प्रगत शेतकरी अंबादास पाटील यांच्यातर्फे सर्व विद्यार्थ्यांना केळीचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.

यावेळी शेतकरी कृती समितीचे अध्यक्ष एस. बी. पाटील यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांनी विद्यार्थ्यांना पालकांना बाजारातून नियमित केळी खरेदी करण्यास सांगावे व निरोगी जीवन जगावे. असे शेतीचे महत्त्व पटवून देत स्थानिक पिकांना प्राधान्य देण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमात शाळेतील मुख्याध्यापक एम.व्ही. पाटील, शेतकरी अजय पाटील,शिक्षक व प्राथमिक, पंकज इंग्लिश स्कूल विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. शिक्षकांनी या उपक्रमाचे नियोजन सुयोग्यरीत्या पार पाडत विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण केली. सूत्रसंचलन राजेंद्र पाटील यांनी केले.अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यदायी सवयी, पोषणाची जाणीव आणि शेतीप्रेम वृद्धिंगत होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. विद्यार्थी मित्रांना रोख बक्षीस देऊन कौतुक केले.

# चोपडा सकल जैन समाजातर्फे विश्वशांती नवकार दिवस उत्साहात साजरा

## ● समस्त जैन बांधवांनी केले सामूहिक नवकार मंत्राचे स्मरण

प्रतिनिधी । चोपडा

**जीतो संघटनेच्या आवाहनानुसार सकल जैन समाज चोपडातर्फे ९ एप्रिल २०२६ रोजी विश्वशांती नवकार दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.**

येथील मेनरोडवरील डॉ. निर्मल टाटिया यांचे प्रांगणचे हॉल येथे सामूहिक नवकार मंत्राचे स्मरण सुरू करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला माजी आमदार कैलास पाटील, पीपल्स बँकेचे चेअरमन चंद्रहास गुजराती ,तहसीलदार भाऊसाहेब थोरात, पोलीस उपविभागीय अधिकारी घोलप साहेब , नगरसेवक तिलकचंद शहा व सकल जैन समाजाचे पदाधिकारी यांचे शुभ हस्ते कलश स्थापना करण्यात




आली. तद्नंतर तहसीलदार थोरात यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, जैन समाजाने विश्वशांतीसाठी महत्वाचे पाऊल उचललेले असून मागील काही दिवसांपासून जागतिक स्तरावर युद्ध सुरू असताना ९ एप्रिलच्या पूर्वसंध्येलाच अमेरिका व इराण चे युद्ध थांबवण्याचे घोषित झाले व विश्वशांतीसाठी भारतातर्फे महत्त्वाचे पाऊल उचलले गेले ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. घनश्याम पाटील यांनी सांगितले की आत्मशुद्धीसाठी मनशांतीसाठी व विश्वशांतीसाठी नवकार मंत्राचे स्मरण अत्यंत महत्त्वाचे मानले गेले आहे. चंद्रहास गुजराती यांनी युवक वर्ग धर्म संस्कृतीशी जोडला पाहिजे या दृष्टीकोनातून जैन धर्मीय सदैव प्रयत्न करत राहतात, असे गौरवोद्गार काढले, सदरील कार्यक्रमाला उद्योजक रवींद्र पाटील, नगरसेविका निशा जैन , गोसन्मान समितीचे के.डी. चौधरी , सतीश पाटील, देवकांत चौधरीयांच्यासह धर्मिय बांधव हजारोच्या संख्येने उपस्थित होते. सकल जैन समाज चे पदाधिकारी रमेश जैन,सुभाषचंद बरडीया, विनोद टाटिया, मोहनलाल श्रावगी, दगडूशेठ जैन, राजेंद्र जैन, अनिल बुरड, यांचे मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वीते साठी समितीचे सदस्य चेतन टाटीया, दर्शन देशलहरा, मयुरेश जैन, प्रा. सौरभ जैन, विशाल जैन, पवन जैन, राजस जैन यांनी प्रयत्न केले

# धानोरा मारहाण प्रकरणातील आरोपींना पोलिस कोठडी

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील धानोरा येथे एकास मारहाण केल्या प्रकरणातील अटकेतील आरोपींना १० एप्रिल २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.**

धानोरा येथील शिवाबंदा हॉटेल परिसरात किरकोळ वादातून हाणामारीत रूपांतर झाले. त्यातून तीक्ष्ण हत्याराने हल्ला करण्यात आल्याप्रकरणी अडावद पोलीस स्टेशन येथे आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. यात संशयित आरोपी गणेश हिम्मत कोळी,जितेंद्र नाईक,गोपीचंद कोळी,भूषण लोढे कोळी,गौरव कोळी,तसेच इतर सहआरोपींचाही समावेश आहे. या हल्ल्यात गणेश गुलाब सोनवणे (वय २२ वर्षे) हे गंभीर जखमी झाले असून त्यांना तत्काळ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

या आरोपींना न्यायालयाने १० एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी ठोठावली आहे. सदरील प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद तात्यासाहेब वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस करीत आहेत.